Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidiciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *अमरावती जिल्हयातील धार्मिक स्थळांचे श्रेणीबध्द वर्गीकरण*

*सचिन एन. भोंबे*

गो. सी. टोम्पे कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार जि. अमरावती

***सारांश :***

प्रस्तुत संशोधन लेखात धार्मिक स्थळाला वेगवेगळया श्रेण्यामध्ये वर्गीकृत केलेले आहे. धार्मिक स्थळाला श्रेणीबध्द करणे याचा अर्थ त्याठिकाणी असणाऱ्या स्थळांची क्रियाशिलता त्यांचा सहभाग कार्यात्मक कसा आहे यावरच धार्मिक स्थळांची श्रेणी कमी अधीक प्रमाणात अवलंबुन आहे. अमरावती जिल्हयामध्ये ज्या धार्मिक स्थळांचा निर्देशांक मूल्य जास्त आहे म्हणजेच उच्च प्रतीच्या यात्रा आहे त्याचप्रमाणे ज्या निम्न दर्जाची धार्मिक स्थळे आहे तेथे वाहतूकीचे वाहने व सुगमता वाढवायला पाहीजे नाहीतर भविश्यात अशी धार्मिक ठिकाणे नामशेष होईल. अमरावती जिल्हयामधील धार्मिक स्थळांचे श्रेणीबध्द वर्गीकरण करण्याचा दृष्टीकोन हाच आहे की, ज्या धार्मिक स्थळांचे महत्व कमी झाले आहे त्यांना तेथील पंचायत समिती, ग्रामपंचायत किंवा तालुक्याच्या ठिकाणाहुन वेगवेगळया प्रकारचे शेतीयोग्य कार्यक्रम, तेथील स्वच्छता, पाणी व्यवस्था या सर्वांचे महत्व लक्षात घेऊन लोकामध्ये असणारी धार्मिक स्थळांबाबत जी उदासिनता आहे ती कमी करायला पाहीजे.

***बीज संज्ञा :***

श्रेणीबध्द, अभिक्षेत्र

प्रस्तावना :

धर्म ही बाब मानवी समाजाशी संबंधीत आहे, त्याचप्रमाणे धार्मिक स्थळ मानवाने आधूनिक युगाचा अभ्यास केल्यानंतर नविन शास्त्रीय व शास्त्राबाबत माहिती मिळविल्यास असे लक्षात येईल की, संपूर्ण भूपृश्ठावरील सजीव सृष्टीचा संहार करण्यास अधिक वेळ लागत नाही. परंतु अजून तरी असे प्रसंग मानवावर येईल याची संभावना वर्तीवल्या जात नाही कारण कोठेतरी नैतिकता आड येत नाहीत्र काही नैतिक बंधने व्यक्तीवर आहे आणि प्रत्येक नैतिकतेचा आधार धर्म, धर्माचरण, धार्मिक रितीरीवाज, धार्मिक परंपंरा व धार्मिक स्थळ हे आहे.

सर्व धर्मावलंबी व्यक्ती सामुहीक किंवा वैयक्तिकरीत्या धार्मिक व विधी परंपरा यांचे पालन करतात. काही धार्मिक विधी पार पाडतात कारण धर्माचरणचाच लोप झाल्यास मानव जातीचा सहांर झाल्याशिवाय राहणार नाही. मानवाला जिवंत राहण्यास जसे अन्नाची गरज भासते तशी आत्म्याची अन्न आत्म समाधान आहे. आत्म समाधान धर्माचरणाशिवाय प्राप्त होऊ शकत नाही. आत्मसमाधानासाठी धार्मिक कर्मकांड करणे अगत्याचे ठरते. तेव्हा मानव कोठेतरी विशीष्ठ स्थळी अशा रितीरीवाज, कर्मकांड, धार्मिक विधी पार पाडत असतो असे ठिकाण म्हणजे धार्मिक स्थळ होय. सदाचरण करण्यासाठी काही समाजापासून दुर धार्मिक स्थळी जावून धार्मिक विधी पार पाडल्यास आपल्या वाट्याला काही पुण्य प्राप्ती होवु शकते धार्मिक स्थळाशी जावून आपण आपल्या रितीरीवाज व कर्मकांड पूर्ण करणे हे भारतीयाचे कर्तव्य आहे असे पुराणातील या श्लोकावरुन स्पष्ट होते. सर्व धर्मावलंबी व्यक्ती वैयक्तिक किंवा सामुहीक स्वरुपाचे हे धार्मिक विधी किंवा कर्मकांड पार पाडतात. आध्यात्मिक शांती, दिव्य प्राण्यांना प्राप्त करणे, आतरीक शक्तीचा विकास करणे या संपूर्ण बाबी साठी कोणत्यातरी स्थळांचा उपयोग केला जात होता ते स्थळ म्हणजे धार्मिक स्थळ होय. विशीष्ठ धर्मानुसार लोक जेव्हा एखाद्या ठिकाणी सामुहीक स्वरुपात धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी एकत्रित होतात अशा स्थळास धार्मिक स्थळ म्हणतात.

धार्मिक स्थळाची निर्मीतीचा विचार केला तर मानवाचा विकास होत असतांना समाजव्यवस्था निर्माण झाली आणि धर्माच्या निर्मीती बरोबरच धार्मिक स्थळांची निर्मीती झाली असे म्हणता येईल. ग्रिक संस्कृतीत परलौकीक कल्पनांना कलेतुन लौकीक आदर्शाचे अभिजात वळण लाभले व ऐहीक जीवनाचे पडसाद कलाकृतीत उमटु लागले. देवत्वाची संकल्पना ही परिपुर्ण व आदर्श मानवी प्रतिमेशी जोडुन ग्रिकांनी ती प्रामुख्याने शिल्पकृतीव्दारे साकारली . यावरुन असे लक्षात येते की धार्मिक स्थळ हे मानवी समाजाच्या विकासाबरोबर धार्मिक व्यवस्था टिकवुन ठेवण्यासाठी अनादिकालापासून धार्मिक स्थळांची निर्मीती झाली.

प्रस्तुत संशोधन लेखात धार्मिक स्थळाला वेगवेगळया श्रेण्यामध्ये वर्गीकृत केलेले आहे. धार्मिक स्थळाला श्रेणीबध्द करणे याचा अर्थ त्याठिकाणी असणाऱ्या स्थळांची क्रियाशिलता त्यांचा सहभाग कार्यात्मक कसा आहे यावरच धार्मिक स्थळांची श्रेणी कमी अधीक प्रमाणात अवलंबुन आहे.

***अभ्यास क्षेत्र :***

अमरावती जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तर सिमेवर असून तो भारताच्या मध्य भागात आहे. अमरावती जिल्हयाचा अधिकतर भाग हा तापी

व वर्धा नदीच्या खोऱ्यात विस्तारीत झाला आहे. अमरावती जिल्हयाचा विस्तार 200 31′ उत्तर ते 210 46′ उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार 760 37′ पूर्व ते 780 27′ पूर्व रेखावृत्तादरम्यान आढळुन येतो. अमरावती जिल्हयाचे क्षेत्रफळ 1221.2 चौ. कि.मी. आहे. महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाशी त्याचे शेकडा प्रमाण 3.96 टक्के आढळते.




***अभ्यासाची उद्दिष्टे :***

(1) अमरावती जिल्हयामध्ये उच्च व निम्न श्रेणीची धार्मिक स्थळे शोधून काढणे.
(2) उच्च श्रेणीची धार्मिक स्थळे एकमेकांपासून दूर अंतरावर असतात.
(3) निम्न व कमी श्रेणीच्या धार्मिक स्थळांची संख्या जास्त असून त्या केंद्रातील अंतर कमी असते.

***संशोधन पध्दती :***

प्रस्तुत संशोधन लेखात क्षेत्रीय अध्ययन व प्रत्यक्ष पाहणीवरुन, मिळविलेल्या आकडेवारीवरुन तसेच अमरावती जिल्हयांचे जनगणना निर्देश ग्रंथ व त्याचप्रमाणे स्थलालेखांचे अध्ययन करण्यात आले. श्रेणीबध्द वर्गीकरणासाठी त्या श्रेणीचे मूल्य मर्यादा ठरविली आहे.स्थळांवर विशेष प्रभावित घटक व वैशिष्ठयांना विशीष्ठ निर्देशांक देऊन प्रत्येक धार्मिक स्थळाला एकूण मूल्य किती प्राप्त होते त्या आधारावर श्रेणीबध्द स्थळांची स्थिती दर्शविली आहे.

***विषय विवेचन :***

धार्मिक स्थळांचे श्रेणीबध्द वर्गीकरण :

अमरावती जिल्हयातील धार्मिक स्थळांना जे निर्देशांक दिले आहे त्यावर आधारीत धार्मिक स्थळांना 5 प्रकारात श्रेणीबध्द केले आहे.

***1) प्रथम श्रेणीची धार्मिक स्थळे :***

यामध्ये अमरावती जिल्हयामधील 5 स्थळांचा समावेश होतो. सालबर्डी, ऋणमोचन, अमरावती, सावंगा व बहिरम या धार्मिक स्थळांना अति उच्च प्रतीचे धार्मिक स्थळे असेही म्हटले जाते. येथील यात्रा अमरावती जिल्हयात नव्हे तर संपूर्ण विदर्भात प्रसिध्द आहे. जवळपास यात्रेच्या कालावधीत 3.5 लाखापेक्षा अधिक लोक भेट देऊन जातात तसेच या स्थळांना येथील भौगोलीक घटकांमुळे नैसर्गिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. म्हणुन हे स्थळ श्अश् श्रेणीमध्ये समाविश्ठ होऊन त्यास सर्वाधिक मूल्य प्राप्त झाले आहे.

***2) द्वितीय श्रेणीची धार्मिक स्थळे :***

यामध्ये 8 उच्च प्रतिच्या स्थळांचा समाावेश होत असून भिलटेक, घुईखेड, गुरुकुंज मोझरी, कौडण्यपूर, रिध्दपूर, पिंपळोद, उमरी

बाजार व मुऱ्हादेवी या यात्राचा समावेश होतो. या धार्मिक स्थळांमध्ये निर्देशांक मूल्यांची संख्या कमी होऊन तशी धार्मिक स्थळांच्या संख्येत भर 'v' श्रेणीची स्थळे ही अमरावती बाहेरील अभिक्षेत्रामधील आकर्शणाचे स्थळ आहे परंतु श्बश किंवा द्वितीय श्रेंणीची धार्मिक स्थळे ही अमरावती जिल्हयाच्या अंतर्गत भागातील आकर्शण केंद्र आहेत यात कोठलीच शंका नाही. ही सर्व प्रसिध्द यात्रा स्थळे असून त्याठिकाणी किमान 1.5 ते 3 लाख यात्रेकरु भेटी देतात.

### *3) तृतीय श्रेंणीची धार्मिक स्थळे :*

यालाच 'd' श्रेणीची व मध्यम स्वरुपाची स्थळे सुध्दा म्हटले जाते. यामध्ये 32 स्थळांचा समावेश होत असून सामान्यतः यामध्ये अमरावती जिल्हयामधील सर्व तालुक्यांच्या ठिकाणाचा समावेश होतो. या श्रेणीच्या धार्मिक स्थळांची वैशिष्टे म्हणजे हे सर्व तालुक्याचे ठिकाणे राज्यमार्गाशी जोडले आहे त्याचप्रमाणे वाहतुकीच्या दृष्टीने सुगमता आहे. 32 धार्मिक स्थळापैकी तळेगाव दशासर, जहागीरपूर, नांदगाव खंडेश्वर, चांदूरबाजार, वरुड, मोर्शी, दर्यापूर, अंजनगाव सूर्जी, धारणी, अचलपूर येथे महत्वाच्या यात्रा असतात. येथे सामान्यपणे 50 हजार ते 1 लाखापर्यंत यात्रेला भेटी देतात.

### *4) चतूर्थ श्रेंणीची धार्मिक स्थळे :*

ही निम्न स्वरुपाची धार्मिक स्थळे आढळून येत असून याला श्डश श्रेणीची यात्रा स्थळे म्हटल्या जाते. यामध्ये 19 धार्मिक स्थळांचा समावेश होतो. ही धार्मिक स्थळे दूर्गम भागात आढळत असून वाहतुकीची सुगमता कमी आढळत असल्यामुळे अशा यात्रेला भेटी देणाऱ्याची संख्या कमी आहे.यामधील तिवसा, चिखलदरा, वायगाव, रेवसा, कोंडेश्वर , कापूस तळणी या प्रसिध्द यात्रा असून त्या एक दिवशीय यात्रा आहे. या धार्मिक स्थळांचे निर्देशांक मूल्य कमी आहे, त्यामुळेच या निम्न स्वरुपात गणल्या जातात.

### *5) पंचम श्रेंणीची धार्मिक स्थळे :*

ही 'bZ' श्रेणीची धार्मिक स्थळे असून यामध्ये सर्वात कमी निर्देशांक मूल्य आढळते म्हणून या धार्मिक स्थळांना अति निम्न स्वरुपाच्या यात्रा स्थळे असेही म्हणतात यामध्ये अमरावती जिल्हयामधील 13 धार्मिक स्थळांचा समावेश होत असून यामध्ये अत्यंत दूर्गम भागातील यात्रा येतात. उदा : मरीयमपूर, वझर इ. हया श्रेणीमध्ये येणारी स्थळे अत्यंत दुर्गम भागात असून रस्त्यांची सुगमता सर्वात कमी आहे. या धार्मिक स्थळी यात्रा भरत नसल्यामुळे या स्थळांचा ऱ्हास होत आहे.

### *तालुकानिहाय श्रेणीबध्द वर्गीकरण :*

प्रस्तुत संशोधन लेखात अमरावती जिल्हयातील तालुकानिहाय श्रेणीबध्द वर्गीकरण स्तंभालेखामध्ये प्रर्दशीत केले आहे. यामध्ये प्रत्येक तहसिलला वेगवेगळया धार्मिक स्थळांचे मूल्य किती आहे व त्याची एकत्रीत गोळा बेरीज करुन त्या तालुक्याच्या एकूण मूल्यावर आधारीत तालुक्याला 4 श्रेणीमध्ये विभाजीत केले आहे.




'v' श्रेणीमध्ये दर्यापूर व चांदूररेल्वे तालुक्याचा समावेश असून दर्यापूर तालुक्यात सर्वाधीक निर्देशांक मूल्य 327 असून शेंडगाव, ऋणमोचन, उमरीबाजार, सामदा व पिंपळोद या सारख्या महत्वाच्या धार्मिक स्थळांचा समावेश होतो. तर चांदूररेल्वे तालुक्याचे मूल्य 304 असून यामध्ये सावंगा विठोबा, घूईखेड, भिलटेक, तळेगाव दशासर इ. स्थळांचा समावेश होतो. श्बश श्रेणीमध्ये मोर्शी, वरुड, अचलपूर व अमरावती तालुक्याचा समावेश होत असून निर्देशांक मूल्य 200 ते 300 च्या दरम्यान आहे तसेच श्कश श्रेणीमध्ये नांदगाव खंडेश्वर, चांदूर बाजार, भातकूली, तिवसा व अजंनगाव सूर्जी या तालुकयाचा समावेश होत असून यात्रांचे निर्देशांक मूल्य 100 ते 200 च्या दरम्यान असून या तालुक्यामध्ये धार्मिक स्थळांची संख्या सूध्दा कमी आहे. श्डश श्रेणीमध्ये प्रामुख्याने अति दूर्गम भागातील यात्रांचा समावेश केला असून यामध्ये चिखलदरा व धारणी तालुक्याचा समावेश होतो. यामध्ये अनूक्रमे एकूण मूल्ये 44 व 35 आहे. या भागात धार्मिक स्थळांची संख्या प्रतिकुल प्राकृतिक रचनेमुळे आहे व त्यामुळे या भागातील धार्मिक स्थळांचा विकास सुध्दा झाला नाही.

या संपूर्ण विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, अमरावती जिल्हयामध्ये ज्या धार्मिक स्थळांचा निर्देशांक मूल्य जास्त आहे म्हणजेच उच्च प्रतीच्या यात्रा आहे अशा नैसर्गिक व प्राकृतिक ठिकाणी पर्यटन केंद्र म्हणून घोषित करावे उदा. सालबर्डी, त्याचप्रमाणे ज्या निम्न दर्जाची धार्मिक

स्थळे आहे तेथे वाहतूकीचे वाहने व सुगमता वाढवायला पाहीजे नाहीतर भविष्यात अशी धार्मिक ठिकाणे नामशेष होईल. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये अमरावती जिल्हयामधील धार्मिक स्थळांचे श्रेणीबध्द वर्गीकरण करण्याचा दृष्टीकोन हाच आहे की, ज्या धार्मिक स्थळांचे महत्व कमी झाले आहे त्यांना तेथील पंचायत समिती, ग्रामपंचायत किंवा तालुक्याच्या ठिकाणाहुन वेगवेगळया प्रकारचे शेतीयोग्य कार्यक्रम, तेथील स्वच्छता, पाणी व्यवस्था या सर्वांचे महत्व लक्षात घेऊन लोकामध्ये असणारी धार्मिक स्थळांबाबत जी उदासिनता आहे ती कमी करायला पाहीजे.

*निष्कर्ष :*

1) 'v' व प्रथम श्रेणीची धार्मिक स्थळे ही संख्येने कमी आहेत त्याचप्रमाणे श्रेणीची प्रतवारी कमी होत आहे. उच्च श्रेणीच्या धार्मिक दोन स्थळांमध्ये अंतर जास्त आहे.
2) 'M' व 'bZ' म्हणजेच चर्तुथ व पंचम श्रेणीची धार्मिक स्थळांची संख्या जास्त असून वाहतूक सुगमतेचा अभाव असल्यामुळे यातील काही धार्मिक जवळजवळ आढळतात तसेच दूर्गम भागात आहे.
3) तालुकानिहाय श्रेणीनुसार धार्मिक स्थळांमध्ये चांदूररेल्वे व दर्यापूर या तालुक्यांचा उच्च दर्जामध्ये समावेश होतो
4) तालुकानिहाय श्रेणीबध्द वर्गीकरणामध्ये चिखलदरा व धारणी तालुक्यातील धार्मिक स्थळे ही दूर्गम भागात आढळत असल्यामुळे निम्न स्वरुपाच्या धार्मिक स्थळांमध्ये समावेश होतो.

*संदर्भसूची :*

1) कुलकर्णी, दत्ताजी (2001) : महाराष्ट्रातील धार्मिक स्थान, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पूणे.
2) नेगी जगमोहन (2001) : संपूर्ण भारत के सांस्कृतिक पर्यटन स्थल, तक्षशिला प्रकाशन, अन्सारी रोड, दरियागंज, नई दिल्ली.
3) गेडाम दे. अ. (1992) : भातकुली तहसिलमधील यात्रा व्यापार स्थळांचे स्थल कालबाधित अंतर, महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधनपत्रिका, वर्ष 6 अंक : 2, डिसेंबर 1992, पा. 25–29
4) Gedam D.A. (1974) : A Geographical Analysis of Fairs at Salbardi, The Indian Geographical Journal Vol. XL XIX, No. 1 P. 17-24
5) Saxena, H.M. (1972) : A Geographical Study of the Fairs of Hadati Plateau, The Deccan Geographer, Vol. 10, No. 1 P. 65-69
6) Tamaskar B.G. (1979) : Indian Fair- Centre system and Networks, vikasheel Bhugol Patrika. Vol. 3, No. 1-2, P. 32-41

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net